# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,

## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


<u>६५) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि.१३.१०.२०२६</u>

जिल्हा : अहिल्यानगर

| मागील आठवड्यातील हवामान (०६/१०/२०२६ ते १२/१०/२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (१४/१०/२०२६ ते १८/१०/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ | <दिनांक> | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | १ |
| ३४.२ | ३४.४ | ३४.४ | ३४.८ | ३५.२ | ३५.४ | ३५.२ | कमाल तापमान (अंसे) | ३६ | ३६ | ३७ | ३७ | ३६ |
| २२.३ | २२.७ | २२.९ | २२.७ | २२.९ | २२.९ | २२.७ | किमान तापमान (अंसे) | २१ | २२ | २३ | २३ | २४ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ढग स्थिती (आकाश) | २ | २ | ३ | ४ | ६ |
| ७७ | ७५ | ७६ | ७४ | ७४ | ७५ | ७८ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ६० | ६६ | ६४ | ६० | ६४ |
| ४० | ३८ | ३७ | ३४ | ३५ | ३५ | ३७ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | २६ | २५ | २४ | २४ | २८ |
| २.५ | २.२ | १.९ | १.६ | १.५ | १.६ | १.३ | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | ४ | ५ | ६ | ५ | ७ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश** | | प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील तीन दिवस हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. तदनंतर आकाश अंशत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. तसेच दिनांक १७ ऑक्टोबर पासून तापमानात घट होण्याची शक्यता आहे आणि वाऱ्याचा वेग वाढण्याची शक्यता आहे. |
| **सामान्य सल्ला** | | १) हवामान अंदाज आधारित कृषी सल्ला व हवामानाच्या पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>२) वीजेच्या अंदाजाचा पूर्वानुमानाकरीता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>३) शेतकऱ्यांना आवश्यक ती कृषी विषयक माहिती , हवामान अंदाज, बाजारभाव, कीड-रोग ओळख व नियंत्रण उपाय , हवामान आधारित कृषि सल्ला , गोदामे व कृषी यंत्रसामग्री भाडे केंद्र यांची माहितीकरीता महाविस्तार ऍपचा वापर करावा.<br>४) पशुधनातील उष्णता व पर्यावरणीय ताण (Heat Stress) व्यवस्थापनासाठी विशेषतः उपयुक्त आहे. या ॲपमध्ये तापमान व आर्द्रतेवर आधारित * THI (Temperature Humidity Index)* मोजून जनावरांची स्थिती (सामान्य , इशारा, धोका, आणीबाणी) दर्शविली जाते आणि त्यानुसार त्वरित मार्गदर्शन तसेच जनावरांच्या संतुलित आहाराची माहिती मिळविण्याकरिता फुले अमृतकाल मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| **संदेश** | | पिकांच्या संवेदनशील अवस्थेत गरजेनुसार आणि पाण्याच्या उपलब्धतेनुसार संरक्षित पाणी द्यावे. |
| **आच्छादनाचा वापर** | | १) आच्छादनामुळे जमिनीतील ओलाव्याचे बाष्पीभवन कमी होण्यास मदत होते.<br>२) आच्छादनासाठी काडी कचरा ,उसाचे पाचट,तुरकाटया,ज्वारीची धसकटे,वाळलेले गवत इ. उपलब्ध सेंद्रीय पीक अवशेष,जमिनीच्या पृष्ठभागावर आच्छादन करण्यास उपयुक्ता आहेत.<br>३) बाष्पीभवनामुळे जमिनीतील सुमारे ७० टक्के ओल उडून जाते . ती थोपवून धरण्यासाठी शेतातील निरुपयोगी काडी कचरा ,धसकटे,गवत,तुरकाडयाचा वापर पीक उगवणीनंतर १५ दिवसांचे आत पिकाच्या दोन ओळीत जमिनीवर हेक्टरी ५ टन पसरावे . यामुळे २५ ते ३० मि .मि. ओलाव्याची बचत होते आणि उत्पादनात ३० ते ४० टक्यांनी वाढ होते. |
| **खरीप पिके** | | सर्व उभ्या पिकांना फुले बायोमिक्सची फवारणी १० मिली प्रति लिटर पाणी प्रमाणे करावी. तसेच सूक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता असल्यास फुले ग्रेड ।। ची फवारणी १० मिली प्रति लिटर पाणी प्रमाणे करावी.<br>जमिनीवरील भेगा बुजविण्यासाठी आणि मातीचे आच्छादन तयार करण्यासाठी हलकी कोळपणी किंवा आंतरमशागत करावी.<br>पुरेसा पाऊस किंवा सिंचन होईपर्यंत खतांची वरखत मात्रा देणे पुढे ढकलावे. पाऊस झाल्यानंतर जमिनीत पुरेसा ओलावा असताना खतांची मात्रा द्यावी.<br>पिकांवर तीव्र ओलाव्याचा ताण असताना तणनाशके आणि कीटकनाशकांची फवारणी टाळावी.<br>कोरड्या हवामानाचा कालावधी वाढल्यास उपलब्ध पाण्याचा वापर सरीआड सरी पद्धतीने करावा |

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| | | आणि पिकांच्या संवेदनशील वाढीच्या अवस्थांना सिंचनासाठी प्राधान्य द्यावे.<br>ओलाव्याचा ताण असलेल्या पिकांवरील रसशोषक किडी आणि रोगांचे नियमित निरीक्षण करावे .<br>फवारणी केवळ शांत, पाऊस नसलेल्या आणि वारा कमी असलेल्या हवामानात करावी. |
| **तूर** | **फुलोऱ्याची अवस्था** | १) किड व रोगांसाठी पिकाचे नियमित सर्वेक्षण करावे.<br>२) वांझ, मर या रोगांचा प्रादुर्भाव दिसताच रोगग्रस्त झाडे उपटून नष्ट करावीत.<br>३) फुलकळी लागताच पहिली फवारणी ५% निंबोळी अर्काची करावी.<br>पावसाचा खंड असल्यास वाढ व फुलोऱ्यावर परिणाम होऊ शकतो. त्यासाठी पाण्याच्या उपलब्धतेनुसार संरक्षित पाणी द्यावे. |
| **कपाशी** | **बोंड धरणे** | रसशोषक किडींसाठी नियमित पाहणी करा. पिवळे चिकट सापळे लावा. गरजेनुसार ५% कडुनिंब बी अर्क किंवा अझाडिरॅक्टीनची फवारणी करा. आर्थिक नुकसान पातळी ओलांडल्यास शिफारशीनुसार कीटकनाशक वापरा वे.गुलाबी बोंडअळीच्या निरीक्षणासाठी प्रति हेक्टर ५ फेरोमोन सापळे लावून नियमित निरीक्षण करा. |
| **सोयाबीन** | **काढणी** | सोयाबीनच्या शेंगांचा रंग पिवळट तांबुस झाल्यानंतर , जातीच्या पक्वतेच्या कालावधीनुसार १०० ते ११० दिवसांत काढणी करावी. पीक काढणीस उशीर झाल्यास शेंगा फुटण्यास सुरुवात होते. |
| **मका** | **परिपक्वता ते काढणी** | पक्व झालेल्या कणसांची काढणी करावी. काढणी केलेले कणसे ४-५ दिवस चांगले उन्हात वळवून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| **बाजरी** | **परिपक्वता ते काढणी** | परिपक्व झालेल्या खरीप बाजरा पिकाची कापणी पूर्ण करून घ्यावी. त्यासाठी ताटाची कणसे विळयाने कापून गोळा करावीत व वाळवून मळणी करावी. |
| **रब्बी पिके** | | सध्याची परिस्थिती पाहता, ज्या भागात पाण्याची उपलब्धता आहे किंवा शेतकऱ्यांना रब्बी पिकांच्या सर्व वाढीच्या गंभीर अवस्थेत पाणी देणे शक्य आहे अशा ठिकाणी रब्बी करिता कमी पाण्यात येणाऱ्या पिकांची निवड करावी.उदा. ज्वारी, बाजरी, करडई, सुर्यफुल, हरभरा, मका इ. |
| **हरभरा** | **पेरणी** | हरभऱ्याची पेरणी करावयाची असल्यास 'फुले विक्रम' या जातीची लागवड करून तुषार सिंचन पद्धतीने पाणी दिल्यास शाश्वत उत्पादन शक्य आहे. |
| **रब्बी ज्वारी** | **पेरणी** | बागायत ज्वारीची पेरणी ४५ ×१२ सें.मी. अंतरावर करावी. जीवाणू संवर्धनाची प्रक्रिया करून हेक्टरी १० किलो बियाणे वापरावे. पेरणीसाठी दोन चाड्याची पाभर वापरून एकाच वेळी खत व बियाणे पेरावे. जिथे ज्वारीची पेरणी लवकर झाली आहे तिथे खोड किडीच्या जैविक नियंत्रणासाठी ५ ते १० ट्रायकोकार्ड आठवड्याच्या अंतराने प्रति हेक्टरी वापरावे. |
| **रांगडा कांदा** | **रोपवाटिका व्यवस्थापन** | कांदा पिकाची पुनर्लागिवड करताना रोपांची मुळे फुले सुपर बायोमिक्स १०० मिली प्रती १० लिटर पाणी द्रावणात किंवा डायथेन ४५ @ २.५ ग्राम किंवा कार्बेन्डॅझिम १ ग्राम प्रति लिटर पाणी द्रावणात बुडवावे. |
| **भाजीपाला पिके** | | जोराच्या वाऱ्याची शक्यता असल्याने भाजीपाला पिकांना बांबू किंवा लाकडी दांड्यांच्या आधारे प्लास्टिकच्या दोरीच्या साहाय्याने एकमेकांना बांधावे. |
| **पशुधन व्यवस्थापन** | | १) खरीप पिकांचा कडबा, भुसा आणि इतर पिकांचे अवशेष योग्य प्रकारे साठवून ठेवावेत.<br>२) जमिनीतील उपलब्ध ओलाव्याचा उपयोग करून चाऱ्यासाठी रब्बी ज्वारीची पेरणी करावी.<br>३) मका पीक उपलब्ध असलेल्या ठिकाणी मक्यापासून मुरघास तयार करून साठवून ठेवावा.<br>४) बांधावरील गवत योग्य पद्धतीने कापून, वाळवून आणि रचून ठेवावे.<br>५) भाताचा पेंढा आणि नाचणीचे काड यांच्यावर १ टक्का युरिया द्रावणाची प्रक्रिया करून त्यांची योग्य प्रकारे गंजी लावून साठवण करावी.<br>६) परतीचा पाऊस झाल्यास कडवळ किंवा चाऱ्यासाठी ज्वारी किंवा मका पिकांची लागवड करावी. अतिरिक्त हिरवा चारा चांगल्या प्रकारे वाळवून त्याचे पुढील आपत्कालीन परिस्थितीत वापर करावा.<br>७) पावसाचे प्रमाण कमी असतानाही चांगली वाढणारी आणि प्रतिकूल परिस्थितीत तग धरू शकणारी चारा पिके, जसे की संकरीत नेपिअर, दशरथ आणि स्टायलो, यांची लागवड करावी.<br>८) चारा टंचाईच्या काळात उपलब्ध चाऱ्याची कुट्टी करून जनावरांना गव्हाणीतून द्यावा. तो एकाच वेळी मोठ्या प्रमाणात न देता जनावरांच्या गरजेनुसार टप्प्याटप्प्याने द्यावा. तसेच , कमी प्रतीचा चारा चांगल्या प्रतीच्या चाऱ्यासोबत योग्य प्रमाणात मिसळून दिल्यास उपलब्ध चाऱ्याचा अधिक परिणामकारक उपयोग करता येतो. |

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा पाणी व्यवस्थापन प्रकल्प, मफुकृवि , राहुरी.

ठिकाण : मफुकृवि , राहुरी.

दि. : १३.१०.२०२६

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरीतथा**

**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**